॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २४ (प्रतिनिधी) : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रशाळांमध्ये सुरु झालेल्या पदवी अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती व्हावी याशिवाय पदव्युत्तर अभ्यासक्रमांची माहिती व्हावी यासाठी विद्यापीठात शुक्रवार दि. २८ जून रोजी १२ वी आणि पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तसेच त्यांचे पालक यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाच्या वतीने सकाळी १० वाजता सिनेट सभागृहात होणाऱ्या या कार्यशाळेत कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्यासह या नवीन अभ्यासक्रमाची माहिती देणारे तज्ज्ञ प्राध्यापक संवाद साधणार आहेत. या संवादामुळे विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमांची माहिती तसेच करिअरच्या संधी याविषयी माहिती मिळेल आणि शंकाचे निरसन देखील होणार आहे.

या नवीन शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठात नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेत बी.कॉम. (बीएफएसआय), भौतिकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) हे दोन नाविन्यपूर्ण चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु होणार आहेत. सेंटर फॉर रिसर्च इन स्कीम्स ॲण्ड पॉलिसी व महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत सुरु होणाऱ्या या अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना शिकाऊ प्रशिक्षणाची (ॲप्रेंटिसशिप) संधी मिळणार आहे. याशिवाय विद्यापीठाने गतवर्षी नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत संगणकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (कॉम्प्यूटर सायन्स), गणित शास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (मॅथेमेटीकल सायन्स) आणि सामाजिक शास्त्र प्रशाळेत बी.ए. (सोशल सायन्स) हे चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु केले आहेत. या पाच अभ्यासक्रमांची तसेच विद्यापीठाच्या विविध प्रशाळांमध्ये असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांची माहिती आणि ओळख या कार्यशाळेत करून दिली जाणार आहेत. याशिवाय विद्यापीठातील सोयी – सुविधा, प्रयोगशाळा, पायाभूत सुविधा याबद्दल देखील विद्यार्थी आणि पालकांना माहिती दिली जाईल. कार्यशाळेत इलेक्ट्रॉनिक्स सेक्टर स्किल्स कौन्सील ऑफ इंडियाच्या पश्चिम विभागाचे संचालक मंगेश मिथे, प्रा. रमेश सरदार, प्रा. जयदीप साळी, प्रा. एस.आर. कोल्हे हे देखील विद्यार्थ्यांशी संवाद साधतील.

या पाच पदवी अभ्यासक्रमांसाठी १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. तर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी पदवी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतील. या सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून www.nmu.ac.in या संकेतस्थळावर माहिती देण्यात आलेली आहे. यंदा प्रथमच विद्यापीठाने विद्यार्थी आणि पालकांमध्ये अधिक जनजागृती व्हावी यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. तरी प्रवेशासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी कार्यशाळेसाठी उपस्थित राहावे असे आवाहन अंतर्गत गुणवत्ता निर्धार कक्षाचे संचालक प्रा. समीर नारखेडे यांनी केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि. २४ (प्रतिनिधी) : श्री संत सद्‌गुरु सखाराम महाराज संस्थान अमळनेर येथून पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी निघालेल्या दिंडीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रा.से.यो. विभागाच्या वतीने 'प्लास्टीक मुक्त, कचरामुक्त दिंडी – हरित वारी निर्मळ वारी – स्वच्छ वारी' अभियान राबविण्यात आले.

रविवार दि. २३ जून रोजी श्री. क्षेत्र अमळनेर ते श्री.क्षेत्र पंढरपूर अशी वारी प्रस्थान झाली. रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी या दिंडीत सहभाग घेवून परिसरातील कचरा, प्लास्टीक जमा करून प्लास्टीक मुक्त वारीचा संदेश दिला. यावेळी श्री. संत सखाराम महाराज यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. फुगडी खेळून विद्यार्थ्यांनी दिंडींचा आनंद घेतला. यावेळी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे, अधिसभा सदस्य डॉ. संदीप नेरकर, प्रताप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.बी. जैन, रा.से.यो. जिल्हा समन्वयक डॉ.दिनेश पाटील, विभागीय समन्वयक डॉ. दिलीप गिन्हे, डॉ. मनीष करंजे, डॉ. हेमंत पवार, डॉ. लिलाधर पाटील, प्रा.रोशनी पाटील आदी उपस्थित होते. प्रताप महाविद्यालय अमळनेर व धनदाई कला महाविद्यालय अमळने या दोन महाविद्यालयांचा यात सहभाग होता.

.......................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २४ जून, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी